# अधिसूचना

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),उर्ध्व वर्धा प्रकल्प,वर्धा
जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय

क्र. म.स./उ.जि./भूसं/उवप्र/कावि-267/2021

दिनांक :-28/06/2021

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 19 (1) खालील अधिसूचना

**भूसंपादन प्रकरण क्रमांक** :- 05/एलएक्यु-47/2019-2020
**मौजा- रुद्रापूर, तालुका- आष्टी, जिल्हा- वर्धा**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (1) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन,अधिसूचना क्रमांक 11 राजपत्र 16-22 जुलै, 2020 अन्वये पान क्रमांक 38 ते 40 अ.क्र. 710 वर प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे की,यासेबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची,अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, वर्धा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे.आणि म्हणुन,उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचि तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये,समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), उर्ध्व वर्धा प्रकल्प,वर्धा यास (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता नमूद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसुची-एक
### जमिनीचे वर्णन

**भूसंपादन प्रकरण क्रमांक** :- 05/एलएक्यु-47/2019-2020
**मौजा- रुद्रापूर, तालुका- आष्टी, जिल्हा- वर्धा**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (हे.आर. मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 23 | 0.32 |
| 2 | 44 | 0.06 |
| एकुण संपादीत क्षेत्र | | 0.38 |

<u>अनुसूची दोन</u>

<u>सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण</u>

| | |
|---|---|
| 1) **प्रकल्पाचे नाव** | : - कार नदी प्रकल्प |
| 2) **सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन** | :- कार नदी प्रकल्पाच्या कालव्याचे मातीकाम व बांधकामाकरीता. |
| 3) **समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार,पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)** | :- सामाजिक कल्याण साधण्याकरिंता कार नदी प्रकल्पामुळे त्या परिसरातील जमीनीला सिंचनाचे लाभ होणार आहे. |

<u>अनुसूची तीन</u>
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**
----निरंक----

<u>अनुसूची चार</u>
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**
----निरंक----

(**टिप** :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.)

दिनांक :- 28/06/2021
ठिकाण :- वर्धा

(मनोजकुमार खैरनार)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
उर्ध्व वर्धा प्रकल्प,वर्धा

(प्रेरणा देशभ्रतार)
जिल्हाधिकारी, वर्धा

जिल्हाधिकारी
वर्धा